**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार  दिनांक ४ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यसभेच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपतर्फे राज्यातल्या चार जागांसाठी उमेदवार जाहीर, नागपूच्या माजी महापौर माया ईवनाते यांचा समावेश**
2. **नागपूर जिल्हयातील स्फोटकांच्या कारखान्यांचं ऑडिट करण्याची काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची मागणी**
3. **राज्य परिवहन महामंडळाची शिवनेरी बस आता नागपूर-चंद्रपूर, आणि नागपूर-अमरावती-अकोला अशा प्रमुख  मार्गांवर धावणार**
4. **अकोला इथं  देशातल्या उच्चांकी 38 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद**

**राज्यसभा उमेदवारी**

राज्यसभेच्या आगामी निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने राज्यातल्या चार जागांसाठी आज उमेदवार जाहीर केले. यात  रामदास आठवले, विनोद तावडे, नागपूच्या माजी महापौर माया ईवनाते आणि रामराव वडकुते यांचा समावेश आहे.**माया इवनाते** या नागपूरच्या माजी महापौर असून त्यांनी १५ डिसेंबर २००७ ते २३ डिसेंबर २००९ या काळात नागपूर महानगरपालिकेचे नेतृत्व केले. भाजपमध्ये अनेक वर्षे सक्रिय राहून शहर आणि प्रदेश पातळीवर विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. आदिवासी समाजातून येणाऱ्या मायाताई ईवनाते यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या सदस्य म्हणूनही काम केल आहे.२०२६ च्या निवडणुकीत नागपूर मनपाच्या प्रभाग १२ मधून त्या भाजपच्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत.दरम्यान, या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार आज चर्चेनंतर जाहीर होतील, अशी माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेस राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे राज्यसभेची जागा काँग्रेसला मिळावी आणि विधान परिषदेची जागा उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला मिळावी, अशी आपली मागणी असून, अंतिम निर्णय वरिष्ठ नेते घेणार असल्याचं ते म्हणाले.राज्यसभा निवडणुकीत ज्येष्ठ नेते शरद पवार यांना उमेदवारी देण्यासंदर्भात महाविकास आघाडी निर्णय घेईल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. यासंदर्भात आपण घटकपक्षांशी चर्चा केली असून, आज नावं निश्चित होतील, असं पाटील यांनी सांगितलं.

विजय वडेट्टीवार

नागपूर येथील SBL कंपनीत झालेला भीषण स्फोट आणि त्यातील जीवितहानीवर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत तीव्र संताप व्यक्त केला. अशा प्रकारच्या घटना थांबविण्यासाठी कोणतीही पावलं उचलली गेली नाहीत अशी टीका करत

वडेट्टीवार यांनी या कंपनीचं ऑडिट करण्याची मागणी केली. नागपूर जिल्हयातील ११ स्फोटक कारखान्यांमध्ये गेल्या दीड वर्षात ४३ कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती देत, गरीब मजुरांच्या जीवाची सरकारला किंमत नाही का, असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. स्फोटकांच्या सुरक्षिततेसाठी जबाबदार असलेले पेसो आणि संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणावर तातडीच्या चर्चेसाठी स्थगन प्रस्ताव मांडण्यात आला असून, विधानसभा अध्यक्षांनी या मुद्द्याची दखल घेत शुक्रवारपर्यंत ‘लक्षवेधी’च्या माध्यमातून सविस्तर चर्चा करण्याचे निर्देश दिले आहेत. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

*बँका किंवा बिगरबँक वित्तीय संस्थांना कर्जपुरवठा प्रक्रीयेत रिझर्व बँकेने घालून दिलेल्या नियमांचं पालन करणं आवश्यक आहे, रिझर्व बँकेने घालून दिलेल्यापेक्षा जास्त व्याजदर लावणाऱ्या किंवा इतर नियमांचं उल्लंघन करणाऱ्या संस्था किंवा सावकारांचे परवाने रद्द केले जातील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्यांना किडनी विकायला लागल्याचा तसंच शेतकऱ्यांकडून कर्जवसुली करताना अत्याचार होत असल्याचा मुद्दा काँग्रेसचे भाई जगताप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केला होता.महामार्गांप्रमाणेच राज्यातल्या सर्व पाणंद रस्त्यांना संकेतांक दिला जाणार असून आतापर्यंत ९७ हजार ५६४ रस्त्यांना असा क्रमांक दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. पाणंद रस्त्यांच्या सीमा आखून त्याची नोंद सातबाऱ्यावर घ्यायचा निर्णय सरकारने घेतला आहे. याची जबाबदारी ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे सोपवली असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्त्याची माहिती देणारं संकेतस्थळ ३१ मार्चच्या आधी तयार केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.. त्याचप्रमाणे राज्यातील ई-पीक पेरा नोंदणी प्रक्रियेत नेटवर्क किंवा सर्व्हरच्या अडचणीमुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्यांवर उपाय म्हणून ऑफलाइन फोटो नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी नेटवर्क नसतानाही आपल्या शेतातील पिकाचा फोटो काढून ठेवला तर नेटवर्क उपलब्ध झाल्यानंतर तो आपोआप प्रणालीवर अपलोड होईल, अशी माहिती बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.बांबू लागवड आणि वापराला प्रोत्साहन देण्यासाठी अटल बांबू समृद्धी योजना सरकार राबवत असून बांबू लागवडीसाठी एका हेक्टरसाठी सात लाख रुपये अनुदान दिलं जातं अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली. बांबुपासून विविध वस्तू तयार करणं हा बुरूड समाजाचा पारंपरिक व्यवसाय आहे. त्यांच्या व्यवसायाला फटका बसला आहे. त्यामुळे त्यांना प्रशिक्षण दिलं जाईल, तसंच त्यांना बांबू उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल असं आश्वासन नाईक यांनी दिलं.*

*आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके*

रणजित मेश्राम निधन

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ समाजसेवक, विचारवंत, आणि पत्रकार रणजित मेश्राम यांचं आज दिर्घ आजारानं नागपुरातील राहत्या घरी निधन झालं.ते समाजशास्त्राचे प्राध्यापक देखील होते. याशिवाय महाराष्ट्र खनिकर्म महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काही काळ

कार्यभार सांभाळला. प्रा. मेश्राम यांनी आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करत सामाजिक प्रबोधनाच कार्य केल. आपल्या लेखनातून आणि व्याख्यानांतून त्यांनी समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांची सातत्याने मांडणी केली. ग्रामीण आणि  शहरी भागात जाऊन त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले. पत्रकारितेतूनही त्यांनी वंचितांच्या प्रश्नांना वाचा फोडली होती. त्यांच्या निधनामुळे आंबेडकरी चळवळीत तसेच सामाजिक आणि साहित्य क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

‘शिवनेरी’ बस

मुंबई-पुणे महामार्गावर धावणारी अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित ‘शिवनेरी’ बस आता राज्यातल्या प्रमुख शहरांदरम्यान चालवण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. त्यासाठी २०० अत्याधुनिक व्होल्व्हो बसच्या खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू असून यात ३० स्लीपर बसेसचा समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं. या बस एस्टीच्या ताफ्यात दाखल झाल्या की नाशिक-पुणे, नाशिक-छत्रपती संभाजीनगर, नाशिक-जळगाव-धुळे,पुणे-कोल्हापूर, पुणे-सांगली,पुणे-सोलापूर,नागपूर-चंद्रपूर, नागपूर-अमरावती-अकोला  अशा  प्रमुख मार्गांवर शिवनेरीची सेवा सुरु होईल अशी माहिती सरनाईक यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.महिला प्रवाशांना तसंच ६५ ते ७५ वयोगटातल्या ज्येष्ठ नागरिकांना शिवनेरीच्या तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, सरनाईक यांनी व्यक्त केला.

इराण युद्ध परिस्थिती

मध्य आशियातील तणाव आजही कायम आहे. इराणच्या सैन्याने काल रात्री दुबईतल्या अमेरिकी दूतावासावर ड्रोन हल्ला केला. दूतावासातले कर्मचारी सुखरुप असल्याचं वृत्त आहे. ऐकुया याबाबत सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधींकडून -

***अमेरिका इस्रायलच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी मारले गेल्यानंतर इराणने पश्चिम आशियातल्या अमेरिकन आस्थापनांवर हल्ल्यांचं सत्र सुरु केलं आहे.  रियाध आणि कुवैत इथल्या अमेरिकी दूतावासांवरही गेल्या दोन दिवसात इराणने हल्ले केले.दरम्यान, अमेरिकेच्या ऑपरेशन एपिक फ्युरीच्या माध्यमातून १०० तासांहून कमी काळात अमेरिकेने जवळपास २ हजार ठिकाणांवर हल्ले केल्याची माहिती अमेरिकेच्या मुख्य कमांडचे कमांडर एडमिरल ब्रॅड कूपर यांनी दिली. तर इस्राएलने आज इराणच्या अंतर्गत सुरक्षा केंद्रांवर हल्ले चढवले. पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे तिथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी परराष्ट्र मंत्रालयाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. १८०० ११८ ७९७ आणि ९१११ २३०१ २११३ या क्रमांकांवरून सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधता येईल. अमेरिका-इराण संघर्षादरम्यान इराणमधल्या भारतीय दूतावासाने तेहरानमधून शेकडो भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या***

***तणावपूर्ण परिस्थितीमुळे आखाती देशांतली हवाई सेवा विस्कळीत झाली आहे. अनेक उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. परिणामी हजारो लोकांचं मायदेशी परतणं अनिश्चित झालं आहे. अमरावतीमधले १२ जण दुबईत तर २ जण अबुधाबी इथे अडकले आहेत. दरम्यान आखातातला संघर्ष थांबवण्यासाठी वाटाघाटीचा मार्ग स्वीकारावा असं आवाहन भारतानं पुन्हा केलं आहे. हा संघर्ष लवकरात लवकर थांबवण्याच्या बाजूनं भारत आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. सुमारे एक कोटी भारतीय आखाती देशात काम करतात, त्यांची सुरक्षितता भारतासाठी महत्त्वाची आहे, असं या निवेदनात म्हटलं आहे.***

***आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी हेमांगी कुळकर्णी***

हवामान

मागील २४ तासांत अकोला इथे देशातल्या उच्चांकी 38 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. येत्या काही दिवसांत तापमान४० अंशांच्या दिशेनं जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये कमाल तापमानात वाढ होत आहे. वर्धा येथे 38 पूर्णांक 5 तर अमरावतीत 38 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. नागपूर मध्ये 36 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. दरम्यान येत्या आठ मार्चपर्यंत हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

टी-ट्वेंटी क्रिकेट

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज पहिला उपांत्य सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड या संघात होणार आहे. कोलकाता इथं संध्याकाळी सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. उपान्त्य फेरीचा दुसरा सामना उद्या भारत आणि इंग्लंड दरम्यान होईल.

******